कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
टोल फ्री क्रमांक - 1064
कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

## :: प्रेस नोट ::

दिनांक :- 15.02.2021.

**तालुका भुमी अभि कार्यालय पैठण येथील उप अधिक्षक जयदिप मधुकर शितोळे यांना 15,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | लोकसेवक श्री. जयदिप मधुकर शितोळे वय 30 वर्ष व्यवसाय नोकरी उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद रा बालार्जी विहार रो हाऊस D 12 पैठण, ता. पैठण जि. औरंगाबाद मुळ रा. तुंगत ता. पंढरपुर जि. सोलापुर (वर्ग - 2 ) |
| 2 | गुन्हा घ ता व ठि | :- | दि- 15.02.2021 रोजी तालुका भुमी अभिलेख कार्यालय, पैठण जि औरंगाबाद येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 15,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, त्यांचे वडीलांचे नावे असलेले बिडकीन ता पैठण जि औरंगाबाद येथील सिटी सर्व्हे नं 1259 मधील जागा वाटणीपत्राव्दारे त्यांचे वाटयाला आलेली 129.5 चौ.मी क्षेत्रफळाची नोंद सिटी सर्व्हेला करण्यासाठी त्यांनी अर्ज दिला होता, सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी तालुका भुमी अभिलेख, पैठण यांचे पाठवल्याने त्यांनी उप अधिक्षक, तालुका भुमी अभिलेख, पैठण यांचेकडे जावुन त्यांचे वाटयाचे क्षेत्रफळाची नोंद करणे बाबत विचारणा केली असता तेथील उप अधिक्षक श्री. जे. एम. शितोळे यांनी, तुमच्या क्षेत्रफळाची नोंद करायची असेल, तर तुम्हाला मला 20,000/- रुपये दयावे लागेल, असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदारास उप अधिक्षक श्री. जे. एम. शितोळे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दि. 15.02.2021 रोजी पडताळणी केली असता उप अधिक्षक श्री. जे. एम. शितोळे यांनी तक्रारदार यांचेकडे 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाले. तसेच दि. 15.02.2021 रोजी आलोसे उप अधिक्षक श्री. जयदिप मधुकर शितोळे यांनी तक्रारदार यांचेकडुन तडजोडीअंती 15,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने उप अधिक्षक, तालुका भुमी अभिलेख कार्यालय, पैठण जि. औरंगाबाद येथे रंगेहाथ पकडले.

लोकसेवक श्री. जयदिप मधुकर शितोळे वय 30 वर्ष व्यवसाय नोकरी उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, पैठण, जि. औरंगाबाद रा बालार्जी विहार रो हाऊस D 12 पैठण, ता. पैठण जि. औरंगाबाद मुळ रा. तुंगत ता. पंढरपुर जि. सोलापुर (वर्ग - 2 ) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक
विभाग,जालना.